भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ४३६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०८/०६/२०१७

**१) मुरमाडी येथे झालेल्या भष्ट्राचारा वरुन शिवीगाळ केली व काठीने मारपीट करुन दुखापत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०५/०६/२०१७ चे १७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी दत्ता मारोतराव पोहरकर वय ४२ वर्ष, रा. समर्थ नगर मुरमाडी हा पंचायत समिती कडुन आपले घरी जात होता तेव्हा तहसिल कार्यालया समोर यातील आरोपी हा त्याचा सोबती रविन्द्र मेश्राम रा. नानोरी सोबत बसला होता तेव्हा फिर्यादीस पाहुण ग्रा. पं. मुरमाडी येथे झालेल्या भष्ट्राचारा वरुन फिर्यादीस आरोपीने शिवीगाळ केली व काठीने मारपीट केली तेव्हा काठी डावे हाताचे मनगटावर लागुन हाताला जखम झाल्याने तो उपचारा करीता भरती झाल्याने आज रोजी फिर्यादीने दिलेले बयान व एमएलसी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२५ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) बिना पास परवाना ०५ ब्रास रेतीची चोरी करुन पळुन गेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०७/०५/२०१७ चे ०७.३० ते ०७.४५ वा. दरम्यान यातील फिर्यादी हे लोक सेवक असुन कोथुर्णा येथील नागठाण्याजवळ यातील आरोपीने आपले ताब्यातील ट्रक रस्त्याचे कडेला उभा असतांना फिर्यादीने चालकाला रेतीच्या रॉयल्टी बाबत विचारणा केली असता ट्रक चालकाने रॉयल्टी नसल्याचे सांगुण ट्रक मध्ये ०५ ब्रास रेती अंदाजे किंमती ५२,०००/–रु. चा ट्रक व रेती सह पळुन गेल्याने सरतर्फे फिर्यादी देवानंद उपराडे यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोस्टे वरठी येथे कलम ३७९,१८६ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंदे पो. स्टे. वरठी हे करीत आहेत.

**३) अंधारात आपले अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्‌देशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०७/०६/२०१७ ते ०२.३० वा. दरम्यान यातील आरोपी हा राजमोबाईल शॉपिक गोबरवाही चे बाजुला अंधारात आपले अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्‌देशाने लपलेला मिळुन आल्याने पोस्टे गोबरवाही येथे कलम १२२(क) मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पो. स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**४) वैनगंगा नदीचे पात्रात तरुण मृत अवस्थेत मिळुन आला. :–**

दिनांक ०६/०७/२०१७ चे १८.०० वा. दर. यातील मृतक तृषार कालीदास मुटकुरे वय २५ वर्ष रा. हेडगेवार चौक भंडारा हा बाहेरुन येतो असे म्हणुन घरुन निघुन गेला रात्र होऊन सुध्दा तो घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतले असता मृतक याचे प्रेत वैनगंगा नदीचे पात्रात मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी तिर्थदास बेलचंद दमाये वय ४२ वर्ष, रा. विनोबा नगर तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गायकवाड पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) दारु पिवुन दारुचे नशेत वाहन चालवितांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

**अ)** दिनांक ०७/०६/२०१७ चे १७.०० ते १७.३० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल दारु पिवुन दारुचे नशेत चालवितांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. चामलाटे वानिशा भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. काटेखाये पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**ब)** दिनांक ०७/०६/२०१७ चे १०.४४ वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल दारु पिवुन दारुचे नशेत चालवितांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. मेश्राम वानिशा भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. दांदडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०७/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०९ तीन सिटर वाहनांवरती २३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.